**धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,धुळे**
मुख्य कार्यालय,गरुडबाग,धुळे 424001
दुरध्वनी क्रमांक 02562-288351 ते 288354
**वेबसाईट-** https://dndcc.bank.in
**ईमेल-** mngradm@dndccbank.co.in

# नोकर भरतीची जाहिरात

धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,धुळे यांचे आस्थापनेवरील 14 तांत्रिक (Technical post) पदांची रिक्त पदे भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदांची संख्या व आरक्षण,परिविक्षाधिन कालावधी, वेतनश्रेणी, आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता, इतर अर्हता, वयोमर्यादा, अनुभव, अर्ज करण्याची पध्दती, परिक्षा शुल्क भरण्याची पध्दत, अर्ज भरण्याची / स्विकारण्याची तारीख / कॉल लेटर उपलब्धी, परिक्षेची तारीख व माहिती, पात्रता व निकष तत्सम महत्वाच्या सुचना तसेच जाहिरात व ऑनलाईन फॉर्मस https://dndcc.bank.in या बँकेच्या वेबसाईट वर उपलब्ध आहेत. सदर फॉर्मस (अर्ज) व परिक्षा शुल्क ऑनलाईन भरुन वर नमुद संकेतस्थळावर प्रस्तुत (Submit) करावेत. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची तारीख 13-02-2026 ते 14-03-2026 अखेर सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत राहिल. बँकेकडे थेट तथा पोस्टामार्फत किंवा कुरिअरव्दारे तथा हस्ते-पर-हस्ते आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

बँकेच्या नोकरभरती संबंधातील अटी व नियमांबाबत परिस्थितीनुसार फेरबदल करण्याचा संपूर्ण अधिकार बँकेस राहील.

(मनोज चौधरी)
दिनांक :-13-02-2026 मुख्य कार्यकारी अधिकारी
ठिकाण :- धुळे धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,धुळे

# धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,धुळे

## मुख्य कार्यालय,गरुडबाग,धुळे-424001

**फोन नं.02562-288351 ते 288354** वेबसाईट **https://dndcc.bank.in**

---

## नोकर भरतीची विस्तृत जाहिरात

**धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,धुळे या बँकेत खालीलप्रमाणे तांत्रिक (Technical post) पदांची भरती करावयाची आहे. सदर भरती प्रक्रियेसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहेत. सदर Online अर्ज (Forms) https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. सदर अर्ज (Forms) व परीक्षा शुल्क ऑनलाईन भरुन वर नमुद संकेतस्थळावर प्रस्तुत (Submit) करावेत. सदर रिक्त पदे भरतीचे अनुषंगाने अधिक माहिती / निकष / पात्रता व इतर तपशिल https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अर्ज स्विकारणेची अंतिम तारीख 14-03-2026 अखेर राहील. बँकेकडे थेट तथा पोस्टामार्फत किंवा कुरिअरव्दारे तथा हस्ते-पर-हस्ते आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.**

| अ. नं. | पद | प्रवर्ग | वयो-मर्यादा | रिक्त पदे संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| **तांत्रिक (Technical post)** | | | | | |
| **A** | i)असिस्टंट मॅनेजर -MM-II (Software & Hardware) 01पद | **खुला(open)** | 18 ते 38 **वर्षे** | 01 | Graduate Degree from recognized university with minimum 50% marks in Engineering in Computer Science / Electronics and Telecommunications/ Information & Technology, BTech Computers/ B.C.A./ M.C.A.,B.sc (Computer)/ M.Sc. (Computer), BCS /MCS or Equivalent Educations Degree. Weightage to be given for banking experience. |
| | ii) सिनिअर ऑफिसर - JM-I (Delivery Channels 02 पदे व MIS 01 पद) | **खुला(open)** | 18 ते 38 **वर्षे** | 01 | |
| | | **अनुसूचित जमाती(ST)/ विजा-अ(NT-A)** | 18 ते 43 **वर्षे** | 02 | |
| | iii) सिनिअर ऑफिसर - JM-II (Delivery Channels 02 पदे व MIS 02 पदे) | **खुला (open)** | 18 ते 38 **वर्षे** | 01 | |
| | | **अनुसूचित जमाती(ST)/ विजा-अ(NT-A)/इमाव/** | 18 ते 43 **वर्षे** | 03 | |
| **B** | लिपीक /सहाय्यक (Clerk) | **खुला (open)** | 18 ते 38 **वर्षे** | 02 | B.sc(Computer) /M.Sc.(Computer), B.E.(I.T./Computer) B.C.A./M.C.A. तसेच संगणक क्षेत्रातील सॉफ्टवेअर / हार्डवेअर मान्यता प्राप्त कोर्सेस आवश्यक |
| | | **अनुसूचित जमाती(ST)/ विजा-अ(NT-A)इमाव/** | 18 ते 43 **वर्षे** | 03 | |
| **C** | शिपाई | **खुला (open)** | 18 ते 38 **वर्षे** | 01 | कमीत कमी इयत्ता 10 वी पास |
| | | | **एकूण** | 14 | |

# धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,धुळे

**मुख्य कार्यालय,गरुडबाग,धुळे-424001**

**फोन नं.02562-288351 ते 288354**

---

**धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,धुळे या बँकेकरीता तांत्रिक (Technical post) पदाची रिक्त 14 पदे भरण्याकरीता महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या पात्र उमेदवारांकडून निवड सुची तयार करणेसाठी https://dndcc.bank.in या बँकेच्या संकेतस्थळावर विहीत नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| अ.नं. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| 1 | **संकेत स्थळावर अर्ज भरणे** | दि. 13-02-2026 ते 14-03-2026 |
| 2 | **ऑनलाईन परीक्षा शुल्क स्विकारण्याचा अंतिम दिनांक** | दिनांक : 14-03-2026 |
| 3 | **ऑनलाईन परीक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यांचा दिनांक** | **बँकेच्या https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द/प्रकाशित करण्यात येईल.** |
| 4 | **ऑनलाईन परीक्षा दिनांक** | **बँकेच्या https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द/ प्रकाशित करण्यात येईल.** |
| 5 | **निकाल दिनांक** | **बँकेच्या https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द/ प्रकाशित करण्यात येईल.** |
| 6 | **कागदपत्रे पडताळणी दिनांक** | **बँकेच्या https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द/प्रकाशित करण्यात येईल.** |
| 7 | **मुलाखत दिनांक** | **बँकेच्या https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द/प्रकाशित करण्यात येईल.** |

**तांत्रिक (Technical post) पदे :-**

1) असिस्टंट मॅनेजर MM-II (Software & Hardware)

| अ.नं. | पदश्रेणी | भरती करावयाचे पद |
|---|---|---|
| 1 | असिस्टंट मॅनेजर MM-II (Software & Hardware) | 01 |

टिप- एकाकी पदास आरक्षण लागू नाही. त्यामुळे सदर 01 पद हे खुल्या (Open Category) प्रवर्गातून भरण्यात येईल.

2) सिनिअर ऑफिसर JM-I (Delivery Channels 02 पदे व MIS 01 पद)

| पद | अनुसूचित जमाती (ST) | अनुसूचित जाती (SC) | विमुक्त जाती व भटक्या जमाती (NT)* | | | | विशेष मागास वर्ग * (SBC) | इतर मागास वर्ग * (OBC) | सा.शै. मा.प्र. (SEBC) | ईडब्लू एस ** (EWS) | अराखीव (Open) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विजा अ | भज ब | भज क | भज ड | | | | | | |
| सिनिअर ऑफिसर JM-I | 01 | 00 | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 01 | 03 |

3) सिनिअर ऑफिसर JM-II (Delivery Channels 02 पदे व MIS 02 पदे)

| पद | अनुसूचित जमाती (ST) | अनुसूचित जाती (SC) | विमुक्त जाती व भटक्या जमाती (NT)* | | | | विशेष मागास वर्ग * (SBC) | इतर मागास वर्ग * (OBC) | सा.शै. मा.प्र. (SEBC) | ईडब्लू एस ** (EWS) | अराखीव (Open) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विजा अ | भज ब | भज क | भज ड | | | | | | |
| सिनिअर ऑफिसर JM-II | 01 | 00 | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 01 | 00 | 00 | 01 | 04 |

4) लिपिक /सहाय्यक (Delivery Channels 01 पद व MIS 04 पदे)

| पद | अनुसूचित जमाती (ST) | अनुसूचित जाती (SC) | विमुक्त जाती व भटक्या जमाती (NT)* | | | | विशेष मागास वर्ग * (SBC) | इतर मागास वर्ग * (OBC) | सा.शै. मा.प्र. (SEBC) | ईडब्लू एस ** (EWS) | अराखीव (Open) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विजा अ | भज ब | भज क | भज ड | | | | | | |
| लिपिक / सहाय्यक | 01 | 00 | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 01 | 00 | 00 | 02 | 05 |

5) शिपाई (Peon)

| पद | भरती करावयाचे पद |
|---|---|
| शिपाई | 01 |

टिप- एकाकी पदास आरक्षण लागू नाही. त्यामुळे सदर शिपाई 01 पद हे खुल्या (Open Category) प्रवर्गातून भरण्यात येईल.

अ) * **वि.जा(अ)/भ.ज.(ब)/भ.ज(क)/भ.ज.(ड)/वि.मा.प्र.,इमाव, शा.सै.मा.प्र./ईडब्ल्युएस, या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलियर) या मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले अलिकडील/नविनतम मूळ नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत प्राप्त करणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्राची पडताळणी कागदपत्र तपासणीच्या वेळी करण्यात येईल.**

**ब) ** EWS :- खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक :-**

1) **सदरचे आरक्षण हे खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी लागू केलेले आहे.**

2) खुल्या प्रवर्गा व्यतिरिक्त इतर प्रवर्गातील उमेदवारांना सदर आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय नाही.

3) या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या / उमेदवाराच्या कुटूंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये 08.00 ( रु.आठ) लाखाच्या आत असले पाहिजे व ती व्यक्ती / तिचे कुटूंबिय महाराष्ट्र राज्यात दि.13 ऑक्टोबर 1967 रोजी किंवा त्यापूर्वीचे रहिवासी असणे आवश्यक आहे.

4) उमेदवाराकडे सक्षम प्राधिकारी यांनी विहित नमुन्यातील निर्गमित केलेले उत्पन्नाबाबतचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

## II) जात वैधता प्रमाणपत्र :-

मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. निवड यादीत निवड झालेल्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास 06 महिन्याचे आत,जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास बँकेच्या सेवेत नियुक्त केलेल्या उमेदवारांना सेवेतून कमी करण्यात येईल.

## III) ऑनलाईन परीक्षा शुल्क :-

ऑनलाईन परीक्षेकरीता खुला प्रवर्ग (Open) साठी असे एकूण रक्कम रु.825/- (GST सह) शुल्क आकारले जाईल व ऑनलाईन परिक्षेकरीता राखीव प्रवर्गासाठी एकूण रक्कम रु.705/-( GST सह) शुल्क आकारले जाईल. सदर ऑनलाईन परीक्षा शुल्क “ना परतावा” राहील. एकदा भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही किंवा इतर कोणत्याही परिक्षेसाठी किंवा निवडीसाठी राखीव ठेवता येणार नाही.

## सुचना :-

1) उमेदवारांनी या नोकरभरती प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी https://dndcc.bank.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे बंधनकारक राहील. परीक्षा शुल्क रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहे. या व्यतिरिक्त उमेदवारांचे लेखी अर्ज व परीक्षा शुल्क बँकेच्या कोणत्याही कार्यालयात स्विकारले जाणार नाहीत व ते अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.
2) परीक्षा शुल्क ऑनलाईन भरल्याशिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण होणार नाही.
3) परीक्षा शुल्काची रक्कम उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीनेच भरणा करता येईल.
4) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना स्वत:चा ईमेल-आयडी, मोबाईल क्रमांक व अद्यायावत (updated) आधारकार्ड क्रमांक अचुक भरणे आवश्यक आहे.
5) उमेदवारांने ऑनलाईन अर्ज भरतांना त्या पदासाठी आवश्यक असणारी सर्व प्रकारची पात्रता धारण करीत असल्याची खात्री करुनच अर्ज भरावा. अपात्र अर्जाबाबत अर्जदारासोबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.
6) सदर भरती प्रक्रिये दरम्यान https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेच्या अद्यायावत माहितीचे अवलोकन करण्याची व त्याप्रमाणे कामकाज करण्याची सर्व जबाबदारी उमेदवाराची राहील.

**IV) तांत्रिक (Technical post) पदांच्या भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज विहीत नमुन्यात सादर करण्यासाठीची पात्रता, निकष व इतर तपशिल खालीलप्रमाणे राहील.**

अ) **शैक्षणिक अर्हता :-**

| अ. नं. | पद | प्रवर्ग | वयो-मर्यादा | रिक्त पदे संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| **तांत्रिक (Technical post)** | | | | | |
| **A** | i)असिस्टंट मॅनेजर -MM-II (Software & Hardware) | **खुला(open)** | 18 ते 38 वर्षे | 01 | Graduate Degree from recognized university |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 01पद | | | | with minimum 50% marks in Engineering in Computer Science / Electronics and Telecommunications/ Information & Technology, BTech Computers/ B.C.A./ M.C. A.,B.sc (Computer)/ M.Sc. (Computer), BCS /MCS or Equivalent Educations Degree. Weightage to be given for banking experience. |
| | ii) सिनिअर ऑफिसर - JM-I (Delivery Channels 02 पदे व MIS 01 पद) | **खुला(open)** | 18 ते 38 वर्षे | 01 | |
| | | **अनुसूचित जमाती(ST)/ विजा-अ(NT-A)** | 18 ते 43 वर्षे | 02 | |
| | iii) सिनिअर ऑफिसर - JM-II (Delivery Channels 02 पदे व MIS 02 पदे) | **खुला (open)** | 18 ते 38 वर्षे | 01 | |
| | | **अनुसूचित जमाती(ST)/ विजा-अ(NT-A) इमाव/** | 18 ते 43 वर्षे | 03 | |
| **B** | लिपीक /सहाय्यक (Clerk) | **खुला (open)** | 18 ते 38 वर्षे | 02 | B.sc(Computer) /M.Sc.(Computer), B.E.(I.T./Computer)B. C.A./M.C.A. तसेच संगणक क्षेत्रातील सॉफ्टवेअर / हार्डवेअर मान्यता प्राप्त कोर्सेस आवश्यक |
| | | **अनुसूचित जमाती(ST)/ विजा-अ(NT-A)/इमाव/** | 18 ते 43 वर्षे | 03 | |
| **C** | शिपाई | **खुला (open)** | 18 ते 38 वर्षे | 01 | कमीत कमी इयत्ता 10 वी पास |
| | | | **एकूण** | 14 | |

**दिनांक 14-03-2026 रोजी उपरोक्त वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता प्राप्त व मुळ कागदपत्र असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.**

**सदर भरतीप्रक्रिया कोणत्याही कारणाशिवाय कोणत्याही टप्प्यावर थांबविणे अथवा रद्द करणेचे सर्वस्वी अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत. अंतीम निवड झालेल्या उमेदवाराने हजर होणेपूर्वी "जिल्हा शल्यचिकित्सक" यांचेकडून शारिरीक क्षमतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र (Medical Fitness Certificate) सादर करणे आवश्यक आहे. नियुक्तीचे ठिकाणी उमेदवारास 15 दिवसाचे आत रुजू होणे आवश्यक राहील.**

## ब) सध्याची वेतनश्रेणी :-

| | **तांत्रिक(Technical post)** | वेतनश्रेणी रुपये (मुळवेतन श्रेणी) |
|---|---|---|
| 1 | असिस्टंट मॅनेजर MM-II (Software & Hardware) | 560-30-620-40-980-50-1130-60-1310-70-2150 |
| 2 | सिनिअर ऑफिसर JM-I (Delivery Channels 02 पदे व MIS 01 पद) | 440-25-490-30-610-40-930-50-1180-60-2020 |
| 3 | सिनिअर ऑफिसर JM-II (Delivery Channels 02 पदे व MIS 02 पदे) | 440-25-490-30-610-40-930-50-1180-60-2020 |

| | | |
|---|---|---|
| 4 | लिपिक /सहाय्यक (Delivery Channels 01 पद व MIS 04 पदे) | 255-10-335-15-410-25-535-30-1045 |
| 5 | शिपाई (Peon) | 215-06-251-07-265-10-335-15-440-20-960 |

क) **निवड कार्यपध्दती :-**

1) **ऑनलाईन परीक्षा:-**

**सदर ऑनलाईन परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या (MCQ) असतील. ऑनलाईन परिक्षेसाठी खालील विषयांच्या विस्तृत अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नांचा समावेश असेल. गणित,इंग्रजी, बँकींग व सहकार,(Accounts,Loans,RBI/NABARD) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी, कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था, माहिती व तंत्रज्ञान,(Hardware /Software, NPCI, Cloude, Networking Cyber Security etc.) बुध्दीमापन चाचणी. ऑनलाईन परिक्षेचे सर्व विषयांचे भाषेचे माध्यम इंग्रजी भाषा असेल.**

2) **कागदपत्र पडताळणी व मुलाखत :-**

**ऑनलाईन परीक्षेत प्राप्त होणाऱ्या गुणांच्या गुणानुक्रमे उपरोक्त नमुद पद संख्येच्या 1:3 प्रमाणानुसार मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.सदर मुलाखतीस पात्र उमेदवारांस शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी बँकेकडून करुन घेणे बंधनकारक राहील. मुलाखतीसाठीचे मुलाखत पत्र ऑनलाईन पध्दतीने https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिले जाईल. सदर मुलाखत पत्र ऑनलाईन पध्दतीने संकेत स्थळावरुन डाऊनलोड करावे. मुलाखत पत्र डाऊनलोड करण्यास अडचण निर्माण झाल्यास बँकेच्या supportrecrt@dndccbank.co.in या मेल-आयडीवर ई-मेलव्दार संपर्क साधावा. कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र होणारा उमेदवारच बँकेच्या धोरणाप्रमाणे मुलाखतीस पात्र होईल.**

3) **कागदपत्रे पडताळणी वेळेस विहीत कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करणे.**

**सदर परीक्षेच्या निकालानंतर मुलाखातीसाठी पात्र झालेल्या उमेदवारांना ( मूळ अर्जासह जो बँकेच्या website वर Online सादर केलेला आहे.) मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे मुलाखतीवेळी (लागू असलेली) सादर करणे अनिवार्य आहे. उमेदवारांनी कागदपत्रे / प्रमाणपत्रांची मूळ प्रत व दोन प्रमाणित झेरॉक्स प्रती सादर करणे अनिवार्य राहील. प्रमाणित झेरॉक्स प्रत मूळ प्रतीवरुन पडताळणी केल्यानंतर प्रमाणित झेरॉक्स प्रत बँकेकडे जमा करावी लागेल.**

| अ.नं. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| 1 | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| | अ) इयत्ता 10 वी |
| | ब) इयत्ता 12 वी |
| | क) पदवीधर |
| | ड) पदव्युत्तर |
| 2 | जन्म तारखेचा पुरावा |
| | अ) L.C. |
| | ब) इयत्ता 10 वी चे मार्कशिट |
| 3 | संगणकीय कोर्सेस |
| | अ) MS-CIT |
| | ब) Tally |

| | |
|---|---|
| | क) Advance Tally |
| 4 | अनुभव प्रमाणपत्र (असल्यास) |
| 5 | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) |
| 6 | उमेदवाराने अर्जात उल्लेख केलेली इतर सर्व प्रमाणपत्रे |
| 7 | वाहन चालविण्याचा परवाना (Driving Licence) |
| 8 | पॅनकार्ड |
| 9 | मतदान कार्ड |
| 10 | पासपोर्ट |
| 11 | विवाहीत स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा (महाराष्ट्र शासन राजपत्रात नावात बदलाची प्रसिध्दी ) |
| 12 | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयं:घोषणापत्र |

## V) मुलाखत :-

कागदपत्रे पडताळणीमध्ये मुलाखतीस पात्र होणाऱ्या उमेदवारांची बँकेने गठीत केलेल्या समितीकडून बँकेचे मुख्यालय,गरुड बाग,धुळे येथे मुलाखत घेण्यात येईल. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो अंतिम निवडीस पात्र राहणार नाही. सदर मुलाखत 10 गुणांची असून सदर गुणांचे भारांकन खाली  नमुद केलेप्रमाणे असेल त्यामध्ये 10 पैकी 05 गुण संबधित उमेदवारांच्या खालील शैक्षणिक व इतर पात्रतेनुसार देण्यात येतील व उर्वरीत 05 गुण मौखीक मुलाखतीसाठी देण्यांत येतील.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | गुणांचे भारांकन |
|---|---|---|
| 1 | तांत्रिक शाखेची पदवी परिक्षा उत्तीर्ण | 01 |
| 2 | तांत्रिक शाखेची पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण | 01 |
| 3 | CAIIB/JAIIB/HDCM/GDC & A परिक्षा उत्तीर्ण | 1.5 |
| 4 | राष्ट्रीयकृत / खाजगी / व्यापारी / सहकारी बँकेतील CBS Platform (Core Banking System) वरील कामकाजाचा किमान  एक वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य | 1.5 |
| | एकूण गुण | 05 |

शिपाई पदासाठी

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | गुणांचे भारांकन |
|---|---|---|
| 1 | इयत्ता 12 वी उत्तीर्ण | 01 |
| 2 | कोणत्याही शाखेची पदवी परिक्षा उत्तीर्ण | 01 |
| 3 | कोणत्याही शाखेची पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण | 01 |
| 4 | राष्ट्रीयकृत / खाजगी / व्यापारी / सहकारी बँकेतील कामकाजाचा किमान  एक वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य | 01 |
| 5 | राष्ट्रीयकृत / खाजगी / व्यापारी / सहकारी बँकेतील कामकाजाचा किमान  दोन वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य | 01 |
| | एकूण गुण | 05 |

## Normalisation (सामान्यीकरण) :-

परिक्षेच्या गुणांमध्ये (Examination Scores) वेगवेगळ्या परिक्षाच्या स्तरामुळे (Difficulty levels) गुणांमध्ये फरक येवू शकतो. त्यामुळे सर्व उमेदवारांची कामगिरी समान स्तरावर (Equality

levels) दर्शविण्यासाठी गुणांचे सामान्यीकरण (Normalisation) केले जाते. त्या पध्दतीचे शास्त्रीय पध्दतीने (Standard Deviation Method) कामकाज करण्यात येईल.

VI) महाराष्ट्र शासन,सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,शासन निर्णय क्र.जिमस 0418 /694/प्र.क्र.69/2-स/ दि.31-10-2025 अन्वये पदभरती करतांना स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्याच्या अनुषंगाने खालील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबविणेचे नमुद केलेले आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र त्या-त्या जिल्ह्यापुरते मर्यादित आहे. तसेच या बँकांचे सर्व सभासद त्या जिल्ह्यातील असतात.त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नोकर भरतीमध्ये स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिल्यास असे कर्मचारी बँकेचे ग्राहक /सभासद /ठेवीदार यांना अधिक चांगल्याप्रकारे सेवा देवू शकतील.त्याद्दष्टीने देण्यात आलेले निर्देश खालील प्रमाणे लागू राहतील.

1) धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र असलेल्या धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील मुळ रहिवासी (Domicile Certificate/अधिवास प्रमाणपत्र) असलेल्या उमेदवारांकरीता 70 टक्के जागा राखीव राहतील.

2) उर्वरीत 30 टक्के जागा धुळे व नंदुरबार जिल्ह्याबाहेरील उमेदवारांसाठी खुल्या असतील. तथापि, जिल्ह्याबाहेरील उमेदवार पुरेसा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास या जागा धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील स्थानिक उमेदवारांमधून भरण्यात येतील.

VII) उमेदवारांची निवड अंतिम सुची:-

उमेदवारांचे ऑनलाईन लेखी परिक्षेतील गुण (एकूण गुण -90) व मुलाखतीचे गुण - 10 (शैक्षणिक व इतर अर्हता गुण भारांकन 05 गुण व मौखीक मुलाखत 05 गुण) यांची बेरीज करुन एकूण 100 गुणांपैकी प्राप्त झालेल्या गुणानुक्रमे पात्र उमेदवारांची अंतिम निवड सुची व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल. अंतीम निवड सुची व प्रतिक्षा यादीमध्ये समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांमध्ये धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या व अधिवास प्रमाणपत्र सादर केलेल्या उमेदवारांना प्रथम प्राधान्यक्रम देण्यात येईल.

मात्र एकापेक्षा जास्त उमेदवार धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील रहिवासी असल्यास त्यातील उच्च शैक्षणिक अर्हता व मिळालेली गुणांची श्रेणी,अनुभव,वयाची सेवाजेष्ठता यांना प्राधान्यक्रम देण्यात येईल.

त्यानुसार अंतिम निवड यादीप्रमाणे/गुणवत्ता यादीप्रमाणे पात्र उमेदवारांना बँकेच्या तांत्रिक (Technical post) पदी परिविक्षाधीन कालावधीकरीता (Probation Period) नियुक्ती देण्यात येईल.

VIII) परिविक्षाधीन कालावधी (प्रोबेशन पिरियड) :-

निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना 01 वर्षासाठी परिविक्षाधीन (प्रोबेशनरी) सेवेत नेमणूक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधीन कालावधीमध्ये तांत्रिक (Technical post) पदासाठी रक्कम असिस्टंट मॅनेजर,MM-II(Software/ Hardware) रु.25,000/-,सिनि.ऑफिसर JM-I,II(Delivery Channels) रु.20,000/- व लिपीक /सहाय्यक (Delivery Channels) रु.15,000/- व शिपाई या पदास रक्कम रु.10,000/- दरमहा एकत्रित पगार देण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही. मात्र उमेदवारास बँक प्रचलीत नियमाप्रमाणे दैनंदिन फिरस्तीसाठी प्रवास खर्च व भत्ता देय राहील.सदर उमेदवारास नेमणूकी बाबतच्या बँकेच्या स्थायी आदेशातील व सेवा नियमावलीतील व वेळोवेळी बँकेकडून निश्चित केलेल्या प्रचलित नियम,अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

IX) अंतिम निवड झालेल्या उमेदवारास बँकेमध्ये किमान 02 वर्षे सेवा करणेबाबत करारपत्र/ हमीपत्र करुन दयावे लागेल.

X) नैसर्गिक आपत्तीमुळे अगर अन्य कारणामुळे विहित दिनांकास लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तर अन्य सोईच्या दिवशी लेखी परिक्षा घेण्यात येईल.

XI) ऑनलाईन परिक्षेसंदर्भात उमेदवारांना महत्वाच्या सुचना :-

1) https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज भरतेवेळी उमेदवारास अर्ज भरण्यास तांत्रिक अडचण आल्यास 02562-232665 व 02562-235223 या बॅकेच्या मुख्य कार्यालय, आय.टी.विभागातील दुरध्वनी क्रमांक आहे. तसेच आस्थापनाबाबत माहिती 9822308701 मात्र या

क्रमांकावर बँकेच्या कार्यालयीन वेळेत म्हणजेच सकाळी 10.00 ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंतच उमेदवाराने संपर्क करावा. अर्ज भरण्यास अडचण निर्माण झाल्यास बँकेच्या supportrecrt@dndccbank.co.in मेल-आयडीवर ई-मेलव्दारे संपर्क साधावा. वरील हेल्पलाईन क्रमांक व मेल आयडी फक्त काही तांत्रिक अडचणी (अर्ज भरतेवेळी, हॉल तिकीट,मुलाखत पत्र डाऊनलोड करतेवेळी इत्यादी ) निर्माण झाल्यास संपर्काकरीता आहे.

2) निवड प्रक्रिया सुरु झालेनंतर किंवा निवडीच्या कोणत्याही क्षणी अगर निवड झाल्यानंतर उमेदवारांने अर्जात दिलेली माहिती /कागदपत्रे तपासणीनंतर खोटी किंवा दिशाभूल करणारी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी /नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल. त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार / विनंती विचारात घेतली जाणार नाही.

3) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज दाखल केला किंवा तो त्या पदासाठीची अर्हता धारण करीत आहे म्हणजे ऑनलाईन परीक्षेस /कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा / नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

4) उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती अंतिम समजणेत येईल.

5) उमेदवारांनी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही पदाधिकारी/अधिकारी यांचेकडून शिफारस /दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास कोणत्याही टप्प्यात अपात्र घोषीत करुन निवडप्रक्रियेतून बाद केले जाईल.

6) ऑनलाईन परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीपूर्वी कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविले जाईल.त्यावेळी उमेदवारांना सर्व मुळ कागदपत्रे घेवून हजर रहाणे बंधनकारक राहील. कागदपत्र पडताळीसाठी गैरहजर असलेल्या उमेदवारांना निवड प्रक्रियतून बाद समजण्यात येईल.

7) सर्व उपस्थित उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी व अचूकता तपासणी नंतरच मुलाखतीसाठी स्वतंत्र दिनांकास बोलविण्यात येईल.

8) उमेदवारांना ऑनलाईन परीक्षा, कागदपत्रे पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

9) यापूर्वी बँकेकडे याच पदासाठी प्रत्यक्ष कागदोपत्री किंवा मेलव्दारे अर्ज केले असतील तर त्यांचे पूर्वीचे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. त्यांना नव्याने ऑनलाईन पध्दतीने विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

10) भरती प्रक्रियेत/निवड कार्यपध्दतीत बदल करण्याचा अधिकार बँकेस असेल व ऐनवेळी काही बदल झाल्यास तो वर्तमानपत्रात किंवा https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर प्रसिध्द केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना वैयक्तीक स्वरुपात कळविले जाणार नाही.

11) त्यामुळे उमेदवारांनी भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेत स्थळावरील सुचना पाहाव्यात. संकेत स्थळावरील सुचना पाहिल्या नाहीत यास्तव आलेलया कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाहीत. या भरतीप्रक्रिया अनुषंगाने कोणत्याही उमेदवाराशी स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही.

12) उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा प्रामुख्याने धुळे व नंदुरबार शहारातील केंद्रावर घेण्यात येईल. मात्र परिक्षार्थीची संख्या विचारात घेवून आवश्यकतेनुसार इतर शहरातील केंद्रावरही परीक्षा घेतली जाईल. परिक्षार्थीची संख्या विचारात घेवून आवश्यकतेनुार परीक्षा एकापेक्षा अधिक सत्रांमध्ये घेण्यात येईल.

13) उमेदवारास मराठी भाषेचे देखील ज्ञान असणे आवश्यक आहे.

14) बँकेने सदर भरती प्रक्रिया तसेच परिक्षेसंदर्भातील मार्गदर्शनासाठी कोणत्याही पब्लीकेशन एजन्सीची नियुक्ती केलेली नाही. यासंदर्भात कोणतीही जाहिरात अगर माहितीही बेकायदेशिर आहे असे समजण्यात यावे.

15) काही अपरिहार्य /आपत्कालीन कारणास्तव परीक्षा स्थगित करणे / पुढे ढकलणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार बँकेस असतील.

16) भरती प्रक्रियेसंदर्भात उदभवणारे वाद/ तक्रारी बाबत बँकेचा निर्णय अंतिम राहील. तसेच कोणताही न्यायालयीन वादासाठी धुळे जिल्हा हे “न्याय कार्यक्षेत्र” असेल (Jurisdiction Dhule Court)

17) ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतेवेळी उमेदवारांना मूळ कागदपत्रे सादर करावयाची नसली तरी, ज्या उमेदवाराकडे आवश्यक शैक्षणिक अर्हता व कागदपत्रे उपलब्ध असतील त्यांनीच उमेदवारी अर्ज दाखल करावा.अवाचनीय/अस्पष्ट कागदपत्रे ग्राह्य धरली जाणार नाहीत.

XII) ऑनलाईन अर्ज व ऑनलाईन परिक्षेचे शुल्क भरण्याची पध्दत :-

1) तांत्रिक (Technical post) पदाकरीता https://dndcc.bank.in या अधिकृत संकेत स्थळावरुन ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज स्विकारण्यांत येतील. इतर कोणत्याही प्रकारचे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आय.डी.व मोबाईल क्रमांक चुकीचा/ अपूर्ण असल्यास तसेच मोबाईल क्रमांक NCRP रजिस्टर (DND) असल्यामुळे संपूर्ण प्रक्रिये दरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना,संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील. त्याप्रमाणे ई-मेल आयडी व संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना बँक जबाबदार राहणार नाही. सदर भरती प्रक्रिये दरम्यान https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेच्या अद्यावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

2) Payment Gateway: - सर्व उमेदवारांना परीक्षेचे शुल्क ऑनलाईन पेमेंटच्या माध्यमातूनच भरणा करावे लागेल. त्याबाबतची संपूर्ण माहिती Payment Gateway मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन किंवा कार्यपध्दती समजून घेवून तद्नंतरच परीक्षा शुल्क चा भरणा करण्यात यावा तसेच फॉर्ममध्ये त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

3) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्र व पुरावे यांचे प्रमाणीत झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. सदर पात्रतेबाबतच्या खोट्या माहितीच्या आधारे ऑनलाईन अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यांत येईल. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुकी झाल्यास किंवा त्रुटी राहिल्याने भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी संबधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. विस्तृत माहितीमध्ये नमुद केलेल्या सर्व अटी व शैक्षणिक अर्हता,वयोमर्यादा इ.बाबतची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

4) उमेदवारांची ऑनलाईन परीक्षाही ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी /छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या फक्त गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पूर्ण छाननी नंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑनलाईन परीक्षेच्या प्राथमिक चाळणी नुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी करण्यात येईल. सदर छाननी प्रक्रियेत अपात्र आढळल्यास त्यास निवडप्रकियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

5) उमेदवारांना एका पदाकरिता एकापेक्षा जास्त अर्ज दाखल करता येणार नाहीत. तसेच एकापेक्षा जास्त अर्ज दाखल करणारा उमेदवार आढळल्यास अशा उमेदवाराचा अर्ज छाननी प्रक्रीयेत अपात्र करुन निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

6) ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी करावयाच्या सविस्तर सुचना https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. सदर ऑनलाईन अर्ज संकेत स्थळावर दिनांक 13-02-2026 रोजी पासून खुला राहील / दाखल करता येईल.

7) ऑनलाईन अर्ज वेबसाईट वर भरण्याची अंतिम तारीख दिनांक 14-03-2026 रोजी पर्यंत असून त्यानंतर संकेत स्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

8) परिक्षा शुल्काची रक्कम व अर्ज फक्त https://dndcc.bank.in यांच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील.अन्य कोणत्याही मार्गाने परीक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही. परिक्षा शुल्क दिनांक 14-03-2026 रोजी सांयकाळी 5.00 वाजेपर्यंत ऑनलाईन स्विकारले जाईल. परिक्षा शुल्क ऑनलाईन भरलेले उमेदवाराच ऑनलाईन परिक्षेस पात्र राहतील.

9) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चे अद्यावत "JPG/PNG" प्रकारची स्वाक्षरी स्कॅन करुन https://dndcc.bank.in या संकेत स्थळावरील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. छायाचित्र (फोटो) स्कॅन केलेली इमेजची साईज 2MB असावी. तसेच स्वाक्षरीच्या स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज 2MB असावी (त्या पेक्षा जास्त मोठी फाईल अपलोड होणार नाही.)

10) उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना स्वत:चे आधारकार्ड "JPG /PDF/PNG" या प्रकारामध्ये स्कॅन करुन https://dndcc.bank.in या संकेत स्थळावरील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. आधारकार्ड स्कॅन केलेल्या ईमेजची साईज 2MB असावी.

11) उमेदवाराने सर्वप्रथम संकेत स्थळावरील विस्तृत माहिती (Advertisement) व सुचना(How to Apply) वाचून घ्याव्यात त्यानंतर ऑनलाईन नोंदणी (New Registration) या लिंकवर क्लिक (Click) करावे. आणि उमेदवारांनी आपली ऑनलाईन नोंदणी करुन जाहिरातीत दिलेल्या सुचनांचे अवलोकन करुन वाचून करुन, समजून घेवूनच ऑनलाईन अर्ज भरावा. सदर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतरच ऑनलाईन परीक्षा शुल्क भरावे.

a) उमेदवारांनी त्यांचा अर्ज https://dndcc.bank.in या संकेत स्थळावरुन स्वत:च्या माहितीसाठी डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची राहील.

b) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना स्वत:ची पूर्ण माहिती ही अचूक भरावी.

12) ऑनलाईन परीक्षेची माहिती उमेदवारांस ई-मेल/एस.एम.एस.व्दारे कळविण्यात येईल. तसेच ऑनलाईन परिक्षेचे प्रवेश पत्र,परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती व विविध सुचना या केवळ https://dndcc.bank.in संकेत स्थळावर उपलब्ध होतील, सदर माहिती पोस्टाव्दारे पाठविण्यात येणार नाही. सदर भरती प्रक्रियेदरम्यान https://dndcc.bank.in या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणारी भरती प्रक्रियेची अद्ययावत माहिती अवलोकन करण्याची जबाबदारी स्वत: उमेदवाराची राहील. उमेदवारास परिक्षेची प्रवेशपत्र ऑनलाईन पध्दतीने डाऊन लोड करता येईल. त्यासाठी उमेदवारांनी त्यांचा अर्ज भरतांना रजिस्ट्रेशन नंबर,युजर आयडी व पासवर्ड जतन करुन ठेवणे आवश्यक आहे व महत्वाचे आहे.

उपरोक्त पात्रता निकष व निवड प्रक्रियेच्या विविध निकषामध्ये बँकेने बदल केल्यास सदर बदलानुसार https://dndcc.bank.in यांच्या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात येईल व त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. तो बदल प्रत्येक उमेदवारावर बंधनकारक राहील.

दिनांक :-13-02-2026

ठिकाण :- धुळे

(मनोज चौधरी)
मुख्य कार्यकारी अधिकारी
धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,धुळे